# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

९वा मजला, सेंटर १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई- ४००००५

दुरध्वनी : ०२२ - २२१५२०१९, ६९३७२००० Email : mwrra@mwrra.in


## जाहीर सुचना

सन २०१४ या तुटीच्या वर्षात उर्ध्व गोदावरी उपखोऱ्यातील समन्यायी पाणी वाटपासंदर्भात माहे एप्रिल २०१४ मध्ये दाखल केलेल्या याचिकांवर प्राधिकरणाने सुनावणी घेऊन दि. १९/०९/२०१४ च्या आदेशान्वये निर्णय दिला होता. तदनंतर, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. २३/०९/२०१६ रोजी दिलेल्या आदेशान्वये प्राधिकरणाच्या सदर आदेशाचे दृढिकरण केले आहे. सदर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशातील परि.१९५ (xi) नुसार प्राधिकरणाने मार्गदर्शक तत्वांचे (Guiding Principles) पुनर्विलोकनाची प्रक्रिया एप्रिल २०१८ मध्ये सुरु केली होती. सदर प्रक्रियेच्या प्रथम टप्प्यामध्ये आधारभूत तपशीलाचे (डाटा) पुनर्विलोकनाचे काम (परिशिष्ठे १ ते ७ आणि प्रपत्र १ ते १०) फेब्रुवारी २०२० मध्ये पूर्ण केले.

तदनंतर, राज्य शासनाने सदर प्रकरणी जुलै २०२३ मध्ये गोदावरी खोऱ्यातील जलाशयांच्या एकात्मिक प्रवर्तनाकरिता विनियमन तयार करण्यासाठी अभ्यास गट स्थापन केला. सदर अभ्यास गटाने प्राधिकरणास अहवाल सादर केला असून तो प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर (https://mwrra.maharashtra.gov.in/) ठेवण्यात आला आहे. सदर अहवालानुसार प्राधिकरणाने पुनर्विलोकनाची प्रक्रिया सुरु केली असून सदर अहवालातील परिशिष्ठे १ ते ७, प्रपत्र १ ते १० आणि तक्ता क्र. ५ व ६ यावर काही अभिप्राय / हरकती असल्यास दि. १५/०३/२०२५ पर्यंत प्राधिकरणास लेखी स्वरुपात किंवा ईमेल द्वारे प्राधिकरणाकडे पाठवावेत.

**सचिव**

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण**

C:\Users\HP\Desktop\Review of GSG\जाहिरात.docx